प्रेस नोट दिनांक २०/७/२०१९

## उत्तमनगर पोलीस ठाणे प्रेस नोट दिनांक

## कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत ब्लुव्ह बर्ड स्कूल कोंढवे धावडे येथील विद्यार्थि व विद्यार्थिनी आणि शिक्षक यांना मार्गदर्शन केले

दिनांक १९/७/२०१९ रोजी कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत उत्तमनगर पोलीस ठाणे हद्दीतील ब्लुव्ह बर्ड स्कूल कोंढवे धावडे येथील विद्यार्थि व विद्यार्थिनी आणि शिक्षक यांची वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शिंगाडे यांनी मिटींग घेतली. मिटींग करीता शाळेचे प्राचार्य सौ.बराटे ,शिक्षक व ५० ते ६० विद्यार्थि, विद्यार्थिनी उपस्थित होते.विद्यार्थि व विद्यार्थिनी यांनी गुड टच,बॅड टच,कुमार वयातील शारीरीक बदल,मानसिक व सामाजिक आणि भावनिक बदल ,छेडछाड,व्यसनाधिनता,ताण तणाव,बाल लैगिक अत्याचार कायदा या बाबत माहिती देण्यात आली. मोबाईल व नेट वापराबद्दल माहिती देवून मार्गदर्शन केले.शिक्षक व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी प्रश्न विचारले त्यांचे सकारात्मक उत्तर देवून समाधान करण्यात आले.त्याचप्रमाणे शाळेतील वाहनांवरील चालक यांचेबरोबर एक महीला विद्यार्थी व विद्यार्थीनीना आणणे व सोडणेकरीता नेमणे बाबत सूचना देण्यात आल्या आहेत.वाहनांवरील चालक यांचे व्हेरीफिकेशन करुन घेणे.वाहनांवर जीपीएस सिस्टम बसविणे,सीसीटिव्ही कॅमेरे बसविणे आदी ही सूचना देण्यात आल्या आहेत.